# पॅकेजिंग: निकष, प्रकार, फायदे

सचिन शितोळे
पदव्युत्तर पदवी विद्यार्थी
भारतीय पॅकेजिंग संस्थान, मुंबई

आपला भारत हा कृषी प्रधान देश आहे. शेतकऱ्याच्या कष्टाने मोठ्या प्रमाणावर आपल्याकडे शेतमाल उत्पादन होते, मात्र त्याला योग्य भाव भेटत नाही किंवा तो जास्त दिवस टिकत नाही किंवा त्याची मोठ्या प्रमाणात नासाडी होते. या सर्वात एक महत्त्वाचा मुद्दा आहे ज्याच्या मदतीने आपण या समस्यांवर तोडगा काढू शकतो तो म्हणजे "पॅकेजिंग"

### पॅकेजिंग म्हणजे काय?

उत्पादकाने उत्पादित केलेल्या उत्पादनाला हाताळणे, साठवणे त्याच बरोबर सुस्थितीत व कमीत कमी खर्चामधे अंतिम ग्राहकापर्यंत सुरक्षित वितरण करण्यासाठी एखाद्या दुसऱ्या उत्पादनाचा वापर केला जातो त्यास "पॅकेजिंग" असे म्हणतात.

### पॅकेजिंग करण्यासाठी खालील प्रकारची उत्पादने वापरली जातात:

- पेपर व पेपर बोर्ड ( उदा. पेपर बॅग, पाऊच )
- लाकूड ( उदा. लाकडी बॉक्स )
- काच ( उदा. काचेची बाटली )
- वेगवेगळे धातू उत्पादने ( उदा. ॲल्युमिनियम फॉईल )
- वेगवेगळे पॉलीमर्स (उदा. HDPE, LDPE, PET ई .)

### पॅकेजिंगचे फायदे:

१. सादरीकरण: पॅकेजिंग ही सायलेंट सेल्समन असते. पॅकेजिंग वर पदार्थाची सर्व माहिती नमूद केलेली असते. आपल्या मालाची पॅकेजिंग आकर्षक असेल आणि आपले उत्पादन पॅकेजिंगच्या मदतीने बाजारपेठेत व्यवस्थित सादर केल्यास त्याच्या विक्री व मागणीत वाढ आपल्याला जाणवते.

२. संरक्षण: वातावरणातील वेगवेगळे घटक आपल्या उत्पादनाला हानी पोहोचवू शकतात, ज्यामुळे मोठ्या प्रमाणावर नासाडी होऊ शकते. आपल्या उत्पादनाचे नासाडी पासून संरक्षण करण्यासाठी पॅकेजिंग महत्त्वाची भूमिका निभावते.

३. नफा: उत्पादनाच्या यशस्वी व प्रभावी हाताळणी, वाहतूक व वितरण या प्रक्रिया दरम्यान पॅकेजिंग महत्त्वाचं कार्य करते. यादरम्यान होणारे नुकसान टळले जाते व नकळत नफा वाढण्यास मदत होते.

४. किंमत: उत्पादनावरील नफ्याच्या कमाल ३०% खर्च पॅकेजिंग वर केला जाऊ शकतो. ग्राहक पॅकेजिंग असलेल्या वस्तूंना खरेदीत प्राधान्य देतो त्यामुळे आकर्षक व साजेशी पॅकेजिंग असल्यास उत्पादनाची किंमत व मागणी वाढते.

५. साठवणूक: पदार्थाला साजेशी व आवश्यक दर्जाची पॅकेजिंग असल्यास पदार्थाची साठवणूक वेळ वाढवली जाऊ शकते. ज्याचा उत्पादकाला मोठ्या प्रमाणात फायदा होऊ शकतो.

### चिन्हीकरण (Labelling) म्हणजे काय ?

एखाद्या खाद्य पदार्थाचे पॅकेजिंग झाल्यानंतर बाजारपेठेतील ग्राहकांना त्या पदार्थाच्या बाबतची सर्व माहिती असणे हे अत्यावश्यक व एफ.एस.एस.आय २०११ या कायद्याने बंधनकारक आहे. त्यामुळे पदार्थामधील सर्व समाविष्ट घटक, किंमत, वजन या सर्व बाबींचा एकत्रित तपशील असणारे लेबल पॅकेजिंग वर चिटकवलेले असणे आवश्यक आहे.

### पॅकेजिंगचे सर्वसाधारण प्रकार:

१. प्राथमिक पॅकेजिंग: प्राथमिक पॅकेजिंग ही आपल्या पदार्थाचा दर्जा/गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी मदत करते. ही पॅकेजिंग पदार्थाच्या थेट संपर्कात असते. उदा. फळांना नुकसान होऊ नये म्हणून PS फोम मध्ये ठेवले जाते.

२. दुय्यम पॅकेजिंग: दुय्यम पॅकेजिंग ही प्राथमिक पॅकेजिंग च्या थेट संपर्कात असते. ही पॅकेजिंग प्राथमिक पॅकेजिंग ला संरक्षण देण्याचं काम करते तसेच वातावरणातील घटकांना पदार्थावर परिणाम करण्यापासून रोखते. उदा. PS फोम मध्ये भरलेली फळे ट्रे किंवा कॅरट मध्ये एकत्रित भरली जातात.

३. तृतीय पॅकेजिंग / एकीकरण: दुय्यम पॅकेजिंग मध्ये पॅक केलेला माल सोप्या व यशस्वीरीत्या हाताळणी, वाहतूक व वितरण करण्यासाठी तृतीय पॅकेजिंग केली जाते. यामध्ये काही बॉक्सेस, कॅरट एकत्रित लाकडी पॅलेटवर ठेवली जातात जेणेकरून यंत्राच्या सहाय्याने मालगाडीत भरता येईल किंवा शितगृहात साठवणे, हाताळणे अगदी सोपे होईल.



प्राथमिक पॅकेजिंग



दुय्यम पॅकेजिंग



तृतीय पॅकेजिंग

★ ★ ★

(संपर्क: +९१ ९८९०२०६६३६)